# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २३९ वा ❑ रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## बिहार विधानसभा निवडणुकीचा अन्वयार्थ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप प्रणित एन डी ए ला घवघवीत यश मिळाले.. फिर से एक बार बिहार मे एन डी ए सरकार हा नारा अखेर खरा ठरला..सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजप ने सर्वोत्तम कामगिरी केली.नितीश कुमार यांच्या जेडीयूला दुसरे स्थान मिळाले.

बिहारचे निकाल केवळ सत्ता परिवर्तनाची कहाणी दडलेली नाही नाहीत, तर या जनादेशामुळे विरोधी पक्ष आणखी तुटला, तर एनडीए राज्यापासून केंद्र सरकारपर्यंत अधिक मजबूत होऊन उदयास आला.

केंद्रात एन डी ए आता अजून मजबूत झाला असून केंद्र सरकारला आता निर्णय घेणे शक्य होणार असून राज्यसभेत देखील स्थिती मजबूत झाली आहे.

या निकालाने पुन्हा एकदा एन डी ए ची स्थिती मजबूत झाली असून या निकालांमुळे महाआघाडीची मोठी पिछेहाट झाली आहे.

विरोधकांचा पुढचा मार्ग गुंतागुंतीचा झाला आहे. महाआघाडी कशी प्रगती करेल यावर त्यांचा थेट परिणाम होईल. महाआघाडीला एकजूट ठेवणे हे आणखी मोठे आव्हान बनू शकते. मुस्लिमांचे तुष्टीकरण करून निवडणुका जिंकता येत नाही..हे परत एकदा सिद्ध झाले आहे.

या निकालांमुळे नितीश कुमार आणि चिराग पासवान दोघांनाही बळकटी मिळाली आहे. नितीश कुमार यांची सुशासन बाबू म्हणून प्रतिमा पुन्हा उदयास आली आहे. नितीश कुमार यांनी पक्षांतर केले तेव्हा अनेक प्रश्न उपस्थित झाले होते आणि त्यांच्या निर्णयांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. परंतु या विजयाने हे स्पष्ट केले आहे की बिहारमध्ये नितीशची जागा घेणे सोपे नाही; बिहारच्या राजकारणात ते एक गरज आहेत.

बिहार विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांनी मत चोरीचा मुद्दा जोरकसपणे मांडला.मात्र मतदारांनी मत चोरी आणि एसआयआर या मुद्द्यांना लोकांनी दुर्लक्षित केले. या मुद्द्याचा, विशेषतः महाआघाडीचा, बिहारच्या मतदारांवर कोणताही परिणाम झाला नाही. मतदानाच्या पहिल्या दिवसापर्यंत काँग्रेस नेते राहुल गांधी यांचे प्राथमिक लक्ष याच मुद्द्यावर राहिले.

महिला मतदारांच्या अभूतपूर्व आणि केंद्रित पाठिंब्यामुळे आणि भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि त्यांच्या सहयोगी पक्षांच्या प्रभावी संघटनात्मक व्यवस्थापनामुळे एनडीएचा विजय झाला. १९५१ पासून ६७.१३% च्या विक्रमी मतदानासह, महिला मतदार सहभागाने (७१.७८%), पुरुषांपेक्षा (६२.९८%) जवळजवळ ८.८०% जास्त, एनडीएचा विजय सुनिश्चित केला. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या महिला–केंद्रित योजना, विशेषतः निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत १०,००० रुपयांची थेट मदत हस्तांतरित करणे, ही या निर्णायक पाठिंब्याची सर्वात अलीकडील प्रमुख कारणे होती.

यावेळी, वाढलेले मतदान सत्ताविरोधी लाटेपेक्षा सत्ताधारी पक्षाच्या बाजूने होते. हे अभूतपूर्व मतदान विशेषतः एनडीएच्या लाभार्थी गटात, म्हणजेच तरुण आणि महिलांमध्ये केंद्रित होते. महिला मतदारांच्या अत्यंत उच्च सहभागामुळे कोणत्याही संभाव्य असंतोष किंवा सत्ताविरोधी मतदान प्रभावीपणे ओव्हरलोड झाले. अशाप्रकारे, बिहारचा २०२५ चा जनादेश हा उच्च मतदान नेहमीच बदलाचे संकेत देतो या कल्पनेला खोडून काढतो आणि त्याऐवजी लाभार्थी–आधारित राजकारणाची खोलवरची मुळे उघड करतो.

एनडीएचे यश केवळ धोरणात्मक घोषणा किंवा लाभार्थी योजनांवरून स्पष्ट केले जाऊ शकत नाही, तर ते भाजपच्या कुशल संघटनात्मक व्यवस्थापन आणि धोरणात्मक कौशल्याचे परिणाम आहे. युती एकसंध ठेवण्यासाठी आणि मतांचे विभाजन रोखण्यासाठी भाजपने जागावाटपाची काळजीपूर्वक वाटाघाटी केली.






## राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन



**नागपूर –** राज्य शासन प्रत्येक आदिवासींना वन जमीन पट्टा देत आहे व त्यांच्या संस्कृतीचे रक्षण करीत आहे. आदिवासींच्या कल्याणासाठी राज्य शासन आदिवासी विकास विभागाच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहे. जनजाती वर्षाच्या निमित्ताने राज्य शासन भगवान बिरसा मुंडा यांनी दिलेल्या शिकवणीनुसार आदिवासींच्या जल, जंगल आणि जमीन व संस्कृतीचे रक्षण करेल, असा विश्वास आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

आदिवासी विकास विभागाच्या वतीने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त व जनजातीय गौरव वर्षांतर्गत येथील मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात राज्यस्तरीय आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे १५ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. आज या महोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके, विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव राजेश कुमार, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यंदाचे वर्ष 'जनजातीय वर्ष' म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील आदिवासी जननायकांचे चरित्र जनतेसमोर आणण्याचे तसेच त्यांचे स्मारके उभारण्याचा कार्यक्रम दिला आहे. राज्य शासनानेही राज्यातील आदिवासी नायकांचा गौरवशाली इतिहास पुस्तकरूपाने जनतेसमोर आणला आहे. विविध योजनांद्वारे आदिवासी समाजाचा विकास साधण्यात येत आहे. राज्यातील आदिवासी आश्रम शाळांचा दर्जा सुधारला आहे. आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी 'स्वयम् योजना' राबविण्यात येत आहे. एकही आदिवासी मुलगा शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. राणी दुर्गावती सक्षमीकरण योजनेद्वारे दीड लाख आदिवासी महिलांना पन्नास हजार ते दीड लाखांपर्यंत मदत करण्यात आली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशात आदिवासी समाजाच्या विकासासाठी 'धरती आबा कार्यक्रम' देशभर राबविण्याचे निर्देश दिले आहेत. राज्यात 'धरती आबा कार्यक्रम' राबविण्यासाठी १७ मंत्रालयांच्या २५ योजना एकत्र करून ३२ जिल्ह्यातील पाच हजार गावांतील प्रत्येक आदिवासी पाड्यांवर रस्ते, पाणी, वीज, रोजगार आणि महिला विकासाच्या योजना पोहाचविल्या जात आहेत. आश्रमशाळांचे डिजिटायजेशन झाले आहे. ३७ एकलव्य शाळांतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली आहे.

देशाच्या विकासात आदिवासी समाजाचे मोठे योगदान आहे. भगवान बिरसा मुंडा हे या समाजाच्या अभिमान व स्वाभिमानाचे प्रतिक आहेत. निसर्गाच्या सानिध्यात राहून आपली समृद्ध परंपरा जपण्याचे कार्य हा समाज करीत असून त्यांच्या सर्वांगिक विकासासाठी संकल्प करण्याचे आवाहन यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. जंगलात राहत असल्याने व शहरी भागापासून दूर असल्याने त्यांच्या विकासासाठी काम होणे गरजेचे आहे. आदिवासींना योग्य संधी मिळण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच हस्तउद्योग, कुटीर उद्योग आदींच्या माध्यमातून व आदिवासी विकासाच्या विविध योजना केंद्र व राज्य शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत. आदिवासींच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकासासाठी केंद्र व राज्य शासन प्रयत्नरत आहे. त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी आर्थिक विकासाचे मॉडेल आखून शासन कार्य करीत असल्याचेही त्यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले की, एप्रिल महिन्यापासून भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर आदिवासी विकास विभागाच्यावतीने भगवान बिरसा सांस्कृतिक मंचाची स्थापना केली. याद्वारे ४० हजार युवा–युवतींची नोंदणी व विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. जनजातीय गौरव वर्षांतर्गत करण्यात आलेल्या विविध आयोजनांची त्यांना माहिती दिली. राणी दुर्गावती योजनेच्या माध्यमातून आदिवासी महिला लखपती दीदी होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

सुराबर्डी, नागपूर येथील गोंडवाना आदिवासी सांस्कृतिक संग्रहालय तथा आदिवासी संशोधन व प्रशिक्षण उपकेंद्राचे भूमिपूजन, शासकीय आश्रमशाळा, घानवळ, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील इमारतीचे लोकार्पण, शासकीय आश्रमशाळा पळसुंडा, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार, जि. पालघर येथील प्रयोगशाळा इमारतीचे लोकार्पण. शासकीय आश्रमशाळा, देवगाव, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक येथील संकुलात मुलींच्या वसतिगृहाचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री फडणवीस यांच्या हस्ते दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले.

आदिवासी विभागाच्यावतीने आयोजित विविध सांस्कृतिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरवही त्यांच्या हस्ते करण्यात आला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री यांच्या हस्ते 'भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रमय पुस्तका'चे आणि 'आदिवासी परंपरा व सर्जनशिलता' यावर आधारित कॉफीटेबल बुकचे प्रकाशन झाले. आमदार सर्वश्री रविंद्र चव्हाण, डॉ. आशिष देशमुख, माजी केंद्रीय राज्यमंत्री भारती पवार यांचीही यावेळी उपस्थिती होती.

## साहित्य अकादमी बाल साहित्य पुरस्कार प्रदान; डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया'ला मराठीसाठी पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली –** प्रतिष्ठित साहित्य अकादमीचे बाल साहित्य पुरस्कार २०२५ चे वितरण आज नवी दिल्ली येथे संपन्न झाले. यात मराठीसाठीचा पुरस्कार ज्येष्ठ बाल साहित्यकार व कवी डॉ. सुरेश सावंत यांना त्यांच्या 'आभाळमाया' या कवितासंग्रहासाठी प्रदान करण्यात आला. डॉ. सावंत यांच्यासह देशातील २४ भाषांमधील साहित्यकारांना हा सन्मान मिळाला. पुरस्कार वितरण सोहळा तानसेन मार्गावरील त्रिवेणी कला संगम येथे पार पडला.

साहित्य अकादेमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. मुख्य अतिथी म्हणून प्रख्यात गुजराती लेखिका वर्षा दास, उपाध्यक्षा कुमुद शर्मा, सचिव पल्लवी प्रशांत होळकर उपस्थित होत्या. प्रत्येक विजेत्याला उत्कीर्ण ताम्रफलक आणि ५०,००० रुपये रोख रक्कम देण्यात आली. पुरस्कारांची घोषणा यापूर्वी १८ जून २०२५ रोजी करण्यात आली होती.


डॉ. सुरेश सावंत हे मराठी बाल साहित्यातील दिग्गज नाव आहे. 'आभाळमाया'मधील कविता मुलांच्या कल्पनाविश्वाला हात घालतात. साधी, भावपूर्ण आणि कल्पनाशील भाषेत लिहिलेल्या या रचना निसर्ग, आकाश, स्वप्ने आणि बालमनाशी जोडलेल्या आहेत. लहान मुलांना आनंद, समज व सौंदर्यदृष्टी देणाऱ्या या कविता त्यांच्या लेखनशैलीचे उत्तम उदाहरण आहेत.


केवळ कवी नसलेले डॉ. सावंत आंतरराष्ट्रीय ख्यातीचे साहित्य संशोधकही आहेत. 'बालसाहित्याचा इतिहास', 'आंबेडकरी साहित्य', 'समाजपरिवर्तनाचे साहित्य' यांसारख्या विषयांवर त्यांनी अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. 'नंदादीप', 'टिंबूपट' ही पुस्तके वाचकांच्या मनात घर करून आहेत, तर 'आमच्यामया' या कादंबरीने बालवाचकांना नवदृष्टी दिली आहे. विद्यापीठ पातळीवर त्यांनी अनेक ग्रंथांचे संपादन व संशोधन केले आहे. मराठी पुरस्कार निवड समितीत एकनाथ आव्हाड, श्रीमती सोनाली नवांगुळ आणि लक्ष्मण कडू यांचा समावेश होता.



**इतर २३ भाषांमधील विजेते**

डॉ. सावंत यांच्यासह असमियासाठी सुरेंद्र मोहन दास ('मइनाहंतर पद्य' कविता), बाङ्लासाठी त्रिदिब कुमार चट्टोपाध्याय ('एखनउ गाये काँटा देय' कहानी), बोडोसाठी बिनय कुमार ब्रह्म ('खान्थि बोसोन आरो आखु दानाय' कहानी), डोगरीसाठी पी.एल.परिहार 'शौक़' ('नन्हींटोर' कविता), इंग्रजीसाठी नितिन कुशलप्पाएमपी ('दक्षिण, साउथ इंडियन मिथ्स अँड फैब्लस रीटोल्ड' कहानी), गुजरातींसाठी कीर्तिदा ब्रह्मभट्ट ('टिंचाक' कविता), हिंदीसाठी सुशील शुक्ल ('एक बटे बारह' संस्मरण), कन्नडसाठी के. शिवलिंगप्पा हंदिहाल ('नोटबुक' कहानी), कश्मीरीसाठी इज़हार मुबशिर ('शुरे ते चुरे ग्युश' कहानी), कोंकणीसाठी नयना आडारकार ('बेलाबायचो शंकर आनी हेर काणयो' कहानी), मैथिलीसाठी मुन्नी कामत ('चुक्का' कहानी), मलयाळमसाठी श्रीजित मुत्तेडत्तु ('पेन्गिनुकळुडे वन्करायळ' उपन्यास), मणिपुरीसाठी शांतो एम ('अंगाङ्शिङ्गी शान्बुङ्सिदा' नाटक), नेपाळीसाठी साङ्मुलेप्चा ('शान्ति वन' उपन्यास), ओडिआसाठी राजकिशोर पाढ़ी ('केते फुल फुटिचि' कविता), पंजाबीसाठी पाली खादिम (अमृत पाल सिंह) ('जादू पत्ता' उपन्यास), राजस्थानीसाठी भोगीलाल पाटीदार ('पंखेरुवं नी पीड़ा' नाटक), संस्कृतसाठी प्रीति पुजारा ('बालविश्वम्' कविता), संतालीसाठी हरलाल मुर्मु ('सोना मीरु–वाक् सांदेश' कविता), सिंधीसाठी हीना अगनाणी 'हीर' ('आसमानी परी' कविता), तमिळसाठी विष्णुपुरम सरवणन ('ओट्राइचिरगु ओविया' उपन्यास), तेलुगुसाठी गंगिशेट्टी शिवकुमार ('कबुर्ला देवता' कहानी) आणि उर्दूसाठी ग़ज़नफ़र इक्बाल ('क़ौमी सितारे' लेख) यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.






# जात्यावरच्या ओव्या......

दिवाळसणाला
नेसते पैठणी
बोरमाळ, बाजूबंद
साज, गळाभर मणी ||३४७||

दिवाळसणाला
नेसते बनारसी साडी
तोरण, दिपमाळ
झगमगते माझी माडी ||३४८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# संगीत देवबाभळी : एक थरारून सोडणारा नाट्यानुभव




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

आवलीला शुद्ध येते तेव्हा ती आपल्या स्वयंपाकघरात पडलेली असते. चुलीजवळ कोणीतरी स्त्री भाकऱ्या करताना तिला दिसते. आपल्या घरात ही कोण नवीन बाई ? तुकारामबुवांनी काही नवीन तर.. ? अशी शंका तिच्या मनात येते. ती त्या स्त्रीला विचारते, कोण ग तू ? आणि माझ्या घरात कशी आलीस ? तेव्हा ती सांगते, माझं नाव लखुबाई. मला तुमची काळजी घ्यायलाच पाठवलं आहे. ही लखुबाई म्हणजेच रुख्मिणी. प्रत्यक्ष विठ्ठलाच्या सांगण्यावरून ती इथं आली आहे. तशी आवली कजाग बाई. विठ्ठलाला चक्क शिव्या घालत असते. पण त्याचं कारणही तसंच असतं. तिचा पती म्हणजेच तुकाराम महाराज विठ्ठलाच्या नादी लागलेले असतात. आपल्या पत्नीकडे, घराकडे, संसाराकडे त्यांचे काडीमात्रही लक्ष नाही. त्यामुळे ती विठ्ठलाला शिव्या देते. आपल्या पतीला हे पंढरीचे भूत लागले आहे आणि त्याने आपल्या सगळ्या संसाराचे वाटोळे केले आहे अशी तिची भावना असते.





आवली विठ्ठलाला चिघळलेली जखम म्हणते. देवाच्या नादी लागण्याचा, नामस्मरणाचा काय उपयोग आहे असे म्हणते. पण आता घरात आलेल्या रुख्मिणीला मात्र तिचे हे विठ्ठलाला म्हणजे आपल्या पतीला शिव्या देणे आवडत नाही. अशी ही कजाग आवली असली तरी वरून काटेरी फणसासारखी दिसणारी आहे. अंतर्यामी मात्र फणसाचे गोड गरे आहेत. अजून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. ती ही की आवली विठ्ठलाला शिव्या देत असली तरी त्यानिमित्ताने का होईना पण ती घेते त्याचेच नाव ! या अर्थाने आवलीही विठ्ठलभक्त आहेच !

रुख्मिणी तिचा पाय हातात घेते. त्याला मलमपट्टी करते. तिच्याच घरात तिच्यासाठी भाकऱ्या बडवून तिला मदत करते. तेव्हा रुख्मिणी विचारते, यातला मला एखादा तुकडा दिला तरी चालेल. तेव्हा आवली म्हणते, तुकडा कशापायी ? पूर्ण भाकरीच देईन की तुला. यातून आवलीचा प्रेमळ स्वभावही दिसून येतो. रुख्मिणी चुलीजवळ बसून जेव्हा भाकरी करते, तेव्हा चुलीतल्या निखाऱ्याचा प्रकाश तिच्या चेहऱ्यावर पडतो. त्याने तिचा मुळातच तेजपुंज असलेला चेहरा उजळून निघतो. तिचं भाकरी करणं, भाकरी शेकणं हे कुठेही नाटकातलं वाटत नाही, इतकं ते जिवंत साकारण्यात ती आणि दिग्दर्शक दोघेही यशस्वी झाले आहेत. आवली जेव्हा घर सारवते, तेव्हाही ते नाटकातलं दृश्य वाटतच नाही.

घर सारवणं नाहीतरी आजकाल कोणाला माहिती आहे ? पण आजच्या पिढीला ते यात माहिती होऊ शकेल.

(क्रमशः)



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# मायाब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

११) नदी नाले, ओढा यात शेवाळे साचलेले असते आपण शेवाळं बाजूला सारून हाताच्या ओंजळीने पाणी घेतो व आपली तहान भागवतो त्याच प्रमाणे या विश्वामध्यें ‘‘मायाब्रम्ह‘‘कालशलेले आहे. त्यामधील माया बाजूला सारून शुद्ध ब्रम्हाचा अनुभव घ्यावा.

१२) ब्रम्ह आकाशासारखे निर्मळ व अत्यंत सुक्ष्म आहे. तर माया प्रुथ्वी सारखी मलीन गढूळ व आतबाहेर स्थूल विशाल आहे.

१३) ब्रम्ह अतींद्रिय आहे तर माया इंद्रियगम्य आहे. ब्रम्ह इंद्रियांच्या कक्षेपलीकडे आहे तर माया इंद्रियांच्या कक्षेत आहे. ब्रम्ह सगळीकडे सारखे आहे तर माया सगळीकडे अधीक उणीव किंवा कमीजास्त आहे.

१४) ब्रम्ह ध्यानाचा विषय होत नाही तर। माया ध्यानाचा विषय होते, ब्रम्ह पुराव्यानिशी सिध्द करता येत नाही पण माया मात्र पुराव्यानिशी सिध्द करता येते. ब्रम्ह तर्काच्या पलीकडे असल्याने तेथे वादाची बाजूच नाही तर माया मात्र तर्काच्या कक्षेत असल्याने तिच्यामध्ये पूर्व पक्ष व ऊत्तरपक्ष अशा वादाच्या दोन्ही बाजू आहेत.

१५) ब्रम्ह एकमेव सिध्दांत तर माया अनेक पूर्वपक्ष आहे. ब्रम्ह शाश्वत आहे तर माया अशाश्वत आहे ब्रम्ह कर्मरहित व हेतु रहित तर माया कर्ममर व हेतुयुक्त आहे.


१६) ब्रम्ह अखंड, सगळीकडे व्यापून राहिलेले भरगच्च परिपूर्ण शाश्वत रूपात चिरकाल टिकणारे आहे. तर माया ही खंडित, जुनाट, कुजकी, नाशवंत,पंचमहाभूतांचे पोकळ रूप आहे.

१७) ब्रम्हाला कोणी घडवत नाही ते स्वयंभू आहे. ते पडत नाही. स्थान भ्रष्ट होत नाही. ब्रम्ह हे शाश्वत सत्य आहे ते कधीच नाहीसें होत नाही. तर माया ही घडवली जाते. ती निर्माण करता येते. ब्रम्ह बाधीत होत नाही पण माया बाधीत होते ती बिघडते.ब्रम्ह आहे तसे रहाते पण माया मात्र आहे तशी रहात नाही ती बिघडते.

१८) ब्रम्ह नाही असे कधीच होत नाही ते प्रलयरहीत आहे. त्याला शेवट नाही. तर माया प्रलयंकारी आहे. तिला शेवट आहे. ब्रम्ह अनंत तर माया ही अंतवत आहे.

१९) ब्रम्ह अत्यंत मुलायम, नाजूक, कोमल अति विशाल सर्व काळ टिकणारे आहे. तर माया अत्यंत कठीण आहे, अति आकुंचित आहे ती नाश पावणारी आहे.

(क्रमशः)



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात.

ज्योतिर्मय साहित्य

नोकरी पाहिजे असेल तर ती देणारा जिथे असतो तिथे आपण जातो; त्याप्रमाणे भगवंताची भेट घ्यायची असेल तर संत जिथे राहतात तिथे आपण जावे. परमेश्वराचे स्वरूप ओळखण्यासाठी संतांकडे जाणेच जरूर आहे. संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून त्यांच्या वचनात आहे. संतांजवळ निर्विषय चित्त असते. रात्री सर्वजण झोपल्यावर शिपाई जसे गस्त घालतात, तसे साधुसंत आमच्या गैरसावधतेत जागृत असतात. आपण झोपी गेलो असताना ते आपली वृत्ती तपासतात. एका बाईला मूल झाले. पण त्याला आकडी येऊ लागली. ते पाळण्यात उगीच निपचित पडून असायचे. ते मूल बरोबर वाढेना, चांगले हसेना, खेळेना. मुलाची ती अवस्था पाहून आईला बरे वाटत नसे. अगदी तसेच संतांना वाटते. शिष्य केला खरा, पण साधनात जर त्याची प्रगती होत नसेल तर संताला वाईट वाटते : शिष्याची प्रगती होत असेल तर संत स्वत:च्या प्रेमापोटीच शिष्याला सजवील आणि त्याचे कौतुक करील. संतांना फारसे कधी कोणी चांगले म्हणत नाही. त्यांनी एकाचे कल्याण केले तर त्या माणसाचे दहा नातेवाईक त्यांना नावे ठेवतात. संतांना ओळखण्याकरिता जे गुण सांगितले आहेत ते त्यांची परीक्षा करण्याकरिता सांगितले नसून, त्यांचा त्या दृष्टीने उपयोगही होत नाही. त्या गुणांचे आपण आचरण करावे म्हणून ते सांगितलेले आहेत.

संतांजवळ राहणाऱ्या लोकांना तीन तोटे आणि तीन फायदे असतात. त्यांपैकी तोटे असे की, एक, वेदान्त बोलायला तेवढा उत्तम येतो; दोन, संतांजवळ राहिल्याने उगीच मान मिळतो; आणि तीन, ‘ते, म्हणजे संत, सर्व पाहून घेतील’ या खोट्या भावनेने हा वाटेल तसे वागतो. आता फायदे पाहू. पहिला म्हणजे, तो जर खऱ्या भावनेने संतांजवळ राहील तर तेवढ्यानेच, काही साधन न करतासुद्धा, त्याचा परमार्थ साधेल; दुसरा, त्याला मान मिळेल, पण तो स्वत: मानाच्या अपेक्षेच्या पलीकडे राहील; आणि तिसरा, वेदान्त त्याला बोलायला आला नाही तरी त्याच्या आचरणात येईल. म्हणून संतांजवळ राहणाऱ्याने ते सांगतील तसे वागावे, मानाची अपेक्षा करू नये आणि फारसा वेदान्त बोलू नये. तोंडापर्यंत आले तरी दाबून टाकावे. संतांची आज्ञा प्रमाण मानणे हे प्रचीती येण्याचे साधन आहे. व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात, हे ओळखून आपण त्यांची संगत करावी. तेल आणि वात असल्यावर दिवा लावायला जसा वेळ लागत नाही, त्याचप्रमाणे आपली भूमिका थोडी तयार असल्यावर सत्संगतीचा परिणाम व्हायला वेळ लागत नाही.

संतांना ओळखण्यासाठी अनुसंधानाशिवाय दुसरे साधन नाही.



# शाळेची मज्जा...

अंकुश शिंगाडे, नागपूर

## सहावं वरीस धोक्याचं ?

ज्योतिर्मय साहित्य

कॉन्व्हेंटच्या शाळा आल्या. यातही काही शाळा किस्तवार शुल्क आकारुन शाळा चालवतात. काही शाळा माफक शुल्क घेतात. काही मात्र जास्त. परंतू आज ते शुल्क कमी आहे. त्यातच त्यांची एवढी जाहीरात आहे की सर्व लोकं मग ते कितीही गरीब का असेना, कॉन्व्हेंटलाच टाकतात. त्यातच तो दिवस दूर नाही की सर्व पालक आपल्या पाल्यांना कॉन्व्हेंटला टाकतील व मराठीच्या शाळेत मुलंच मिळणार नाहीत.

महत्वपुर्ण गोष्ट ही लक्षात घेण्यासारखी आहे की आज मराठीच्या अनुदानीत शाळेत कितीही का असेना मुलं आहेत. परंतू ज्यावेळी मराठीच्या अनुदानीत शाळा बंद पडतील, त्यानंतर कॉन्व्हेंटच्या शाळेचं शुल्क एवढं भरमसाट वाढेल की गरीब लोकं आपली मुलं शिकवू शकणार नाहीत. ते आंदोलन करतील. परंतू त्याचा उपयोग होणार नाही. कारण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.

आज गरीबीचा आकडा व अनुदानीत शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांचा आकडा जास्त आहे. सरकार हा आकडा कमी व्हावा यावर वेळोवेळी प्रयोग करुन प्रयत्न करीत आहे. ती बाब आपल्या लक्षात येत नाही. कारण आपण विचारशील व्यक्तीमत्वाचे असलो तर तेवढ्या चिकीत्सक विचारसरणीचे नाही. सरकारनं याच व्यापारीक विचारानं पेन्शनवर कुऱ्हाड चालवली आणि हळूच शाळेच्या अनुदानावर. ब-याच दिवसापासून नान सॅलरी ग्रँडही बंद आहे. आर टी ई चे पैसे देवू केले. परंतू कोणत्याही शाळेला मिळाले नाही. हा व्यवहारीक बदल काय दर्शवतो ? ही विचार करणारी बाब आहे.

विशेष गोष्ट अशी की आज जो पालक साक्षर आहे, त्याला सरकारचं नवीन शैक्षणिक धोरण कळत जरी असलं तरी तो आपल्याला काय करायचंय असा विचार करतो. जो अज्ञानी पालक आहे, त्याला या गोष्टी कळत नाही. जो अल्पशिक्षीत आहे, परंतू त्याचेजवळ भरमसाठ पैसा आहे, तो पालक चिकीत्सक जरी असला तरी तो विचार करतो की आपल्याला काय घेणंदेणं आहे. मरणं मात्र गरीबांचंच आहे.

विशेष गोष्ट ही की वय वर्ष सहा हा शाळा प्रवेशाचा आकृतीबंध पेन्शन बंदसारखाच आकृतीबंध वाटतो. काल पेन्शनधारकांची पेन्शन बंद झाली. उद्या गरीबांच्या शाळा बंद होतील यात शंका नाही. सरकार पुरेपूर स्वरुपात खाजगीकरण करण्यासाठीच लागलं आहे. ही निर्वीवाद सत्य बाब आहे. यामुळं वेळीच सावध व्हावे. नाहीतर तेल गेलं तूप गेलं, हाती धुपाटणं आलं अशी अवस्था देशातील गरीबांची निर्माण होवू शकते. ही शक्यता नाकारता येत नाही. वय वर्ष सहा, ही विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी चांगली बाब आहे. परंतू ती बाब विचारात घेऊन सरकारनं पडद्यामागचं राजकारण करु नये. गरीबांच्या शाळा बंद करु नये म्हणजे झालं.



# ॥ शिक्षण-संवाद ॥

अंकुश शिंगाडे, नागपूर

## शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं ?

ज्योतिर्मय साहित्य

विशेष सांगायचं झाल्यास प्रकल्पातून विद्यार्थ्यात संशोधन वृत्ती वाढीस लागते. त्यासाठी जी निरीक्षण शक्ती लागते. ती विद्यार्थ्यात निर्माण होते व विद्यार्थ्याचं भविष्य उज्ज्वल होते. जर त्या प्रकल्पास पालक, शिक्षक, व्यवस्थापन मंडळ सहकार्य करीत असतील तर. जर असं सहकार्यच प्रकल्पाच्या बाबतीत मिळालं नाही तर ते विद्यार्थी मागे पडतात. ज्यातून त्या विद्यार्थ्यांचंच नाही तर देशाचेही नुकसान होत असतं. असं होवू नये म्हणून प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावं याचा विचार करणाऱ्या सर्वच घटकांनी निदान प्रकल्प मोहिम राबवितांना सर्वतोपरीनं मदत करावी. ज्यातून शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं ठरेल. यात दुमत नाही. हे तेवढंच खरं.

शिक्षणात वेगवेगळे प्रयोग करणं गरजेचं ?

शिक्षण ही गोष्ट सर्वांसाठी उपयोगाचं आहे. जर शिक्षण नसेल यर त्या व्यक्तीची अवस्था ही एखाद्या प्राण्यागत असते. प्राण्यांना बोलता येतं. चालता येतं. काबाडकष्टाची कामं करता येतात. सांगकाम्या प्रकाराची स्थिती त्यांची होवून जाते. अन् एवढं सगळं करुन देखील पळसाला पानं तीनच असल्यागत त्यांची अवस्था होवून बसते. माणूस नावाचा हा प्राणी इतर प्राण्यांवरच अत्याचार करीत असतात. त्यांना गुलामासारखं वागवत असतात. त्यांच्याकडून कष्टाची कामं करुन घेतात. बदल्यात साधं पोटभर अन्नही मिळत नाहीत. परंतु तरीही ते कामाच्या बाबतीत इमानदार असतात. कारण त्यांना शिक्षण नसल्यानं ते गुलाम असतात. ते आपल्यावर होणाऱ्या अत्याचारावर दादही मागू शकत नाहीत. ती दाद त्यांना मागण्याची उजागिरीही नसते. ते गुलाम असल्यानं माणूसं त्यांना मारतही असतात. परंतु त्यावर ते प्राणी त्यांना कमालीची ताकद असूनही ते माणूस नावाच्या प्राण्याला क्षतीही पोहचवू शकत नाही.

माणसाच्याही जीवनात असंच आहे. जो व्यक्ती शिकत नाही. त्याची अवस्था ही गुलामासारखीच असते. जणू त्या प्राण्यांसारखी. त्यांना नीट निर्णय घेता येत नाही. शिकलेला वर्ग त्याचेवर सतत अत्याचारच करीत असतात. त्याच्याकडून काबाडकष्टाची कामं करवून घेत असतात. बदल्यात काहीही देत नाहीत. अर्थात मोबदलाही कमी देत असतात. जास्त काम करुनही. जसा शेती करणारा वर्ग.

(क्रमशः)




# दगडीपाला.. कुटकुटी...कंबरमोडी अथवा टणटणी

ज्योतिर्मय साहित्य

कुटकुटी अर्थात दगडीपाला हे एक सुर्यफूल कुळातील गवत आहे. सुर्यफूलाप्रमाणे या गवतास छोटीछोटी फुले येतात. दगडीपाल्याचा वापर मनुष्यप्राणी ठणठणीत होण्यासाठी होत असल्याने, दगडीपाला शतकानुशतके लोकप्रिय आहे.

१) जखम निर्जंतुकीकरणास्तव व बरी करण्यासाठी : जखमेवर दगडीपाला चोळुन त्याचा रस लावणे. चोथा जखमेवर पोटीस करुन बांधणे. सर्वोत्तम उपाय.

२) मुतखडा काढण्यासाठी ( ) :
दगडीपाल्याचा अर्धा कप रस ९ दिवस अनोशापोटी पिल्यास ३ दिवसानंतर मुतखडा राळ होऊन बाहेर पडतो.
मुतखडा हा लेसर शस्त्रक्रियेद्वारे राळ होऊन बाहेर पडण्यास ९ दिवस लागतात.त्यापेक्षा या उपायाने कमी कालावधी लागतो.

३) पोटदुखी, अपचन, अजीर्ण, इ. उदरशुळास्तव दगडीपाल्याचा अर्धा कप रस ९ दिवस अनोशापोटी पिल्यास सर्वोत्तम !

४) चरबी, स्थुलपणा, घालविण्यासाठी : दगडीपाल्याचा रस मधाबरोबर समप्रमाणात १/२ कप नियमीत पिल्यास चरबी कमी होतो.

५) मधुमेह संपुष्टात आणण्यासाठी : दगडीपाल्याचा रस मधाबरोबर समप्रमाणात १/२ कप नियमीत अनोशापोटी पिल्यास निश्चित फायदा होतो. सोबत त्रिसुपुर्ण स्तोत्र म्हटल्यास मधुमेहाचे ३० पेक्षा अधिक प्रकार बरे होतात.

६) तोंड येणे दगडीपाला चघळावा : तोंडातील जखमा पुर्ण बरोबर होतात. तोंडाचा कॅन्सर कधीही होत नाही. गुटखा, मावा सेवनाने ज्यांच्या तोंडात व्याधी निर्माण झाल्या आहेत, त्यांनी खिशात पाने ठेवून आवश्यकतेनुसार चघळावीत. रस गिळून चोथा थुंकून द्यावा.

७) हाडांचा ठिसुळपणा :
दगडीपाल्याच्या सेवनाने हाडे बळकट होतात.

८) व्हेरीकोज व्हेन, पाठीचा कणा :
दगडीपाला रस १/२ कप व गोक्षुर २ चमचे यांचे सेवन उत्तम.

९) थाईरॉईड : दगडीपाला १/२ कप व सैंधव १/२ चमचा यांच्या सेवनाने बरा होतो.

आयोडीन पेक्षा दगडीपाला सर्वोत्तम!

१०) दगडीपाला अतिप्रमाणात सेवन केल्यास कंबरेला त्रास होतो, म्हणुन ‘‘कंबरमोडी’’ या नावानेही दगडीपाला ओळखला जातो.

पण प्रमाणात सेवन केल्यास म्हणजे ३ चमचे गोक्षुर, ३ चमचे मधाबरोबर एक कप दगडीपाला रस मिश्रण करुन सेवन केल्यास कंबरदुखी व वात, उष्णतेचे विकार, पुर्ण बरे होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

११) बेडसोर्स : रुग्णाला रुग्णालयात वा बेडवर जखमा होतात, या सर्व जखम दगडीपाला रसाने धुतल्यास पुर्ण बरे होतात. वयोवृध्दांना खूपच फायदेशीर.

१२) कर्करोग : तोंडाच्या कर्करोगामध्ये नियमीत दगडीपाला चघळल्यास खूपच आराम मिळतो, किंबहुना बरा होतो.

१३) त्वचारोग : दगडीपाला रस अनेक त्वचाविकारात फायदेशीर आहे.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी–चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

# बिबट्यांचे माणसांवरील हल्ल्याचे अघोषित, अकल्पित युध्द !

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

ज्या गोष्टी आत्तापर्यंत कधीही घडल्या नव्हत्या. किंवा अशा गोष्टींचा आतापर्यंत कुणीही कधीही विचारही केला नव्हता. त्या हिंस्त्र प्राण्यांचं संकट म्हणा किंवा हिंस्त्र प्राण्यांच्या आक्रमणाचा गहन प्रश्न म्हणा ग्रामस्थांसमोर आणि शासनाच्या वनविभाग, पोलिसखाते, महापालिकेसमोर पर्यायाने राज्य शासनासमोर उभा राहिला आहे. गतवर्षी सन २०२४मध्ये हिंस्त्र प्राण्यांच्या हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या माणसांचं व जनावरांचं प्रमाण कमी होतं. पण, यावर्षी मात्र त्याचं प्रमाण भयानक वाढलं आहे. त्यातल्यात्यात पुणे शहराच्या आसपासच्या खेडेगावात व पुणे शहरात समाविष्ट करण्यात आलेल्या खेडेगावात सन २०२५ मध्ये गेल्या दोन तीन महिन्यांमध्ये हिंस्त्र बिबट्यांच्या हल्यात मृत्यूमुखी पडलेल्या बायका, माणसे व मुलांच्या प्रमाणात वाढ झाली आहे, हेच या घटनांवरून दिसून येत आहे. बिबट्याचा वावर पुणे शहराच्या आसपासच्या जून्नर, जांबूत व पिंपरखेड भागात वाढला असल्याच्या घटना घडल्या आहेत. पण, बिबट्या थेट माणसांच्या घरात घुसून माणसाच्या जीवावरच उठला असल्याचे महिनाभरात घडलेल्या घटनांवरुन दिसून येत आहे. शिरुर येथील जांबूत आणि पिंपरखेड येथे गेल्या आठवडाभरात घडलेल्या दोन घटनांनी त्या गावांतील नागरिक खूप भयभीत झाले असून आता थेट या भागात दहशत पसरवणाऱ्या बिबट्यालांच मारण्याचे आदेश वनविभागाने दिले आहेत. पण, हे आदेश देण्याआधी बिबट्याच्या अशा दहशतीच्या भागातील ग्रामस्थांना अनेक राज्य महामार्गावर येऊन अनेक तास रस्ता रोको आंदोलन करावे लागले. त्यानंतरच, शासन आदेशाने वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी कसोशीने तपास करुन अनेक पिंजरे लावून बिबट्याचा शोध लावला. बिबट्याला माणसांची चाहूल लागली असता त्याने अधिका-यांवर झेप घेतली असता अधिका-यांनी त्याच्यावर बंदूकीतून गोळ्या झाडल्या असता बिबट्या गतप्राण होवून खाली कोसळला. त्या अधिका-यानी दहशतग्रस्त भागातील ग्रामस्थांना तो मारलेला बिबट्या दाखवला. तेव्हा, लोकांचा जीव थोडा भांड्यात पडला. पण, हा प्रकार इथेच थांबलेला नाही.

अलीकडेच बिबट प्रवण क्षेत्रात झालेल्या संशोधनानुसार त्या क्षेत्रात १००० बिबट्यांचे वास्तव्य आहे. गेल्या पंचवीस वर्षांत बिबट्यांच्या हल्यात ५५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. १४८ नागरिक हल्यात जखमी झाले.

साधारणपणे सन २०२० पर्यंतची ही आकडेवारी आहे. सन २०२० नंतर २०२५ पर्यंत पाच वर्षांत

बिबट्याने माणसांवर, जनावरांवर हल्ला करण्याची संख्या दूप्पट झाली आहे. पाच वर्षात २००००हून अधिक पशुधनाची शिकार, २५ नागरिकांचा मृत्यू व ४३ नागरिकांवर गंभीर हल्ला बिबट्यांकडून झाला आहे. पुणे जिल्ह्यात जुन्नर, खेड व आंबेगावात सर्वाधिक बिबटे आहेत. तसेच, आतापर्यंत माणिकडोह बिबट निवारा केंद्रात ६५ बिबटे पिंज-यात जेरबंद आहेत. या भागात अनेक धरणे उभी राहिली आहेत. त्यामुळे, पाण्याची मुबलकता


वाढली आणि शेतीही विस्तारली आहे. जुन्नर आणि लगतच्या तालुक्यांमध्ये ५० वर्षांपासून बिबट्यांचा वावर आहे. मात्र गेल्या तीन दशकांत त्यांची संख्या वेगाने वाढली. त्यामुळे, धरण भागात उसक्षेत्रात बिबट्यांची संख्या वाढली जुन्नरच्या ऊसामध्ये राहणारे बिबटे हळूहळू आंबेगाव, खेड व शिरूर तालुक्यात गेले. शिरुरकडील बिबट्यांनी दौंड बारामतीकडे आपला मोर्चा वळवला. तर खेडकडील बिबटे मावळ मुळशीच्या दिशेने पूढे सरकले. भोर, राजगड व मुळशीमध्येही बिबटे वाढत आहेत.याबाबतची सविस्तर माहिती अनेक वर्तमानपत्रांतूनही प्रकाशित झालेली आहे. अलिकडेच झालेल्या सर्वेक्षणानुसार गेल्या दहा वर्षांत दौंड, बारामती, पुरंदर व इंदापूरमध्ये उसाची शेती वाढली. त्यामुळे, इथेही बिबट्यांचा वावर वाढला आहे. तसेच, या तालुक्यात व गावात जंगलकटाई करुन अकृषिक जागा करुन अनेक मजली इमारती रहिवास विभागासाठी बांधल्याने तसेच नजीक शेतातही घरे असल्याने उसप्रवण क्षेत्र व तालुका क्षेत्र जवळ झाल्याने बिबट्यांचे शहरांमध्ये ,घरांमध्ये थेट हल्ले होवू लागले आहेत. याआधीच्या दशकात बिबटे, वाघ कधीही शहरात, घरात आलेले नाहीत. हे बिबट्यांचे,वाघांचे माणसांवर, जनावरांवर अघोषित, अकल्पित युध्दच सुरु झालेले आहे असेच म्हणावे लागेल. ही गोष्ट संबंधित शासकीय खात्याच्या प्रमुखांनी व अधिका-यांनी तसेच, राज्य शासनाने अत्यंत गांभीर्याने घेवून सर्व जनतेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निर्भयपणे सर्व जनतेला त्यांची दैनंदिन कामे शेतातील व घरातील करता येण्यासाठी अत्यंत उपयुक्त अशी उपाययोजना करुन संबंधित अधिकाऱ्यांना त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश दिल्यास सर्व जनतेच्या व राज्याच्या हिताच्या व सुरक्षेच्या दृष्टीने खूप उपयुक्त होईल. कारण, गेल्या दोन तीन दशकांमध्ये बिबट्यांच्या रहिवासाचे प्रमाण हळूहळू वाढत गेलेले आहे. कारण, एक मादी प्रत्येकवेळी दोन ते तीन पिलांना जन्म देते. त्यामुळे बिबट्यांची संख्या खूप वाढली आहे. ते वनविभागाच्या लक्षात आले नाही. तिनं दशकांपूर्वी बिबट्यांचा वावर मनुष्य वस्तीपासून दूर होता. गावाच्या जवळील भरपूर वाढीव उसक्षेत्रामुळे तसेच, भरपूर जंगलकटाईमुळे बिबटे आणखी मनुष्य वस्तीजवळ आले. त्यामुळे , बिबट्यांचा मनुष्य वस्तीजवळील वावर वाढत गेला. त्याचुच त्यांच्या बछड्यांनाही झाली. त्यामुळे, गावातील घरांच्या गोठ्यात बांधलेली जनावरे गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या ही सहजासहजी बिबट्यांच्या भक्षस्थानी पडू लागली. पूढे चालून तर, बिबट्यांनी थेट माणसांवरील हल्ला सुरु केला. अंगणातील मुलांना ,माणसांना हल्ला करुन बिबटे ओढून घेवून जावू लागले.


© SANJAY DARAMWAR

त्यामुळे, बिबटे आणि माणसातील युद्धच सुरु झाले आहे. हेच यातून दिसून येते. बिबट केंद्रात सध्या पिंजरे मर्यादित प्रमाणात आहेत. महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यांत बिबट्यांचा प्रादुर्भाव, उच्छाद दिसून येत आहे.

त्यातल्यात्यात एकट्या पुणे जिल्ह्यात एक हजारापेक्षा जास्त बिबटे आढळून आले आहेत.

यात, मुख्य अडचण अशी आहे की, या बिबट्यांना कोणीही ग्रामस्थ किंवा नागरिक बंदूकीतून मारु शकत नाही. तसा कायदाच आहे. त्यामुळे, जनता हतबल आहे. उसाचे क्षेत्रही कमी करता येत नाही. कारण, शेतक-यांचे ते आर्थिक उत्पन्नाचे साधन आहे. बिबट्यांच्या वाढत्या प्राणघातक हल्ल्या पासून सुरक्षित आणि कायमस्वरूपी ठोस उपाययोजनेचा निर्णय घेणे राज्य सरकारला अत्यंत आवश्यक झाले आहे. दरमहा बिबट्यांच्या वाढत्या संख्येचा आढावा घ्यावा लागेल. बिबट्यांच्या वाढत्या संख्येचा विचार केला तर एवढे हजारो पिंजरे बनवून त्यांना त्यात ठेवून त्याचे नियंत्रण करणे सरकारी यंत्रणांना शक्य होणार नाही असे दिसून येते.


लेख व काव्यरचना
मधुकर निलेगावकर, पुणे
९४२१३७५६९१

भारत सरकारने परदेशातून काही बिबटे पूर्वी आयात केले होते. तसे, महाराष्ट्रातील वाढीव संख्येचे बिबटे परदेशात पाठविले तर ते सूरक्षिततेच्या दृष्टीने खूप उपयुक्त होईल असे वाटते. अन्यथा, महाराष्ट्र राज्याच्या सर्वच भागात बिबट्यांचा वावर वाढून बिबट्यांचे अधिराज्य वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. आतापर्यंत अनेक देशांमध्ये परस्परात अनेक वर्षांपासून युद्धे चालू आहेत. ती युध्दे माणसामाणसांमधील आहेत. पण, आताचे हे बिबट्या आणि माणसांमधील युद्ध हे अकल्पित,अघोषित कधीही स्वप्नात देखील माणसांनी विचार केला नसेल असे हे वेगळेच युध्द आता सुरु झालेले आहे. याला कारणीभूतही एकविसाव्या शतकातील माणसांची जीवनशैली व विकासशैली कारणीभूत आहे. विकासाच्या नावाखाली जंगलातील व वनातील चंदनाच्या, व सागवानी तसेच, अन्य मौल्यवान अशा हजारो मोठ्या वृक्षांची मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करुन त्यांची तस्करी करुन कांही दुष्ट,क्रूर लोक कोट्यवधी रुपये कमवीत आहेत. तसेच, वनातील, अनेक गावांतील मोठमोठी झाडे तोडली गेल्यामुळे व तेथे रहिवासी विभागाच्या मोठ्या इमारती उभ्या केल्या जात आहेत. हा कसला विकास आहे! हा तर गावे भकास करण्याचा उद्योग आहे, असेच आता म्हणावे लागेल. तसेच,पुणे जिल्ह्याच्या अनेक तालुक्यांतील गावांमध्ये हे बिबटे दिवसाढवळ्या बिनदिक्कतपणे गावात येऊन गाई, म्हशी, बैल व शेळ्या मेंढ्या यांना सहजपणे मारुन खात आहेत. वने व ओढे जवळ असल्यामुळे त्यांची खाण्यापिण्याची चांगली व्यवस्थाच झाली आहे. अशा हिंस्त्र प्राण्यांना माणसांच्या व पाळीव जनावरांच्या रक्ताची चटक लागली आहे. याला कारणीभूत शहरीकरणाची वाढ व जंगलकटाई करणारी दुष्ट व क्रूर माणसेंच आहेत. तसेच, ही परिस्थिती महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतही उद्भवली आहे. काल, परवाच एका व्हिडिओमध्ये नाशिक शहराच्या मुख्य रस्त्यांवरुन चार मोठे बिबटे बिनधास्तपणे फिरत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे, पूढेचालून हे अकल्पित व अघोषित असे माणसें व बिबटे यांच्यामधील युध्द भयंकर उग्ररुप धारण करण्याची दाट शक्यता आहे. याबाबतीत, राज्य शासनाची शासकिय यंत्रणा,

राज्य शासन विशेष तत्पर असल्याचे दिसून येत नाही. लोकांनी प्रचंड मोर्चे काढल्याशिवाय व आंदोलने केल्याशिवाय शासन शासकीय यंत्रणांना आदेश देणार नाही का! बहुतांशी क्षेत्रात अवैधपणाने, नियमविरहीत पध्दतीने अनधिकृत कामे केली जात आहेत. त्यात बांधकाम क्षेत्र, रस्ता वाहतूक क्षेत्र, शहरातील व खेडेगावातील, वनातील वृक्ष, झाडे अनधिकृतपणे तोडणे, शाळा, आश्रमशाळा, नाट्यगृहे, रेल्वेस्टेशन, बसस्टँड इत्यादी क्षेत्रातील व्यवस्था सुव्यवस्थितपणाची न राहता बेजबाबदारपणे निकृष्ट दर्जाची व्यवस्था होत असल्याचे अनेक दैनंदिन वर्तमानपत्रातून याबाबतच्या बातम्या व लेख प्रकाशित झाल्याचे निदर्शनास आले आहे व निदर्शनास येत आहे. काही क्षेत्रात तर उच्च न्यायालयाने व सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करुन शासनाच्या

अनेक क्षेत्रातील यंत्रणांवर ताशेरे ओढून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिल्याचेही दैनिक वर्तमानपत्रातील बातम्यांवरुन दिसून आले आहे. मानवी जीवन जर सुरळीत आणि सुखदायी, आनंददायी ठेवावयाचे असेल तर राज्य सरकारला नम्र विनंती आहे की, राज्य शासनाने माणसें व बिबटे यांच्यातील अतिउग्र होऊ पाहणाऱ्या अघोषित, अकल्पित युध्दाबाबतीत ठोस पावले उचलून, विशेष उपाययोजना अंमलात आणून त्यांची कडक नियमावली तयार करुन संबंधित खात्यांवर त्याची जबाबदारी निश्चित करुन त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित क्षेत्रातील सर्व यंत्रणांना दिले तर ग्रामीण भागातील लोकवस्तीच्या जनतेला व निष्पाप जनावरांना अभय मिळेल. त्यामुळे, विनाकारण त्यांचे प्राण जाणार नाहीत. मुख्य

म्हणजे शहरातील व वनातील व जंगलातील जी अवैध वृक्षतोड होत आहे. त्याबाबतीत अशी अवैध दूष्कृत्ये करणा-या घातक लोकांवर अत्यंत कडक कारवाई झाली वअशा लोकांना खूप दंड व कडक शासन झाले तरच ही अवैध दूष्कृत्ये होणार नाहीत. किंवा त्यांचे प्रमाण तरी खूप कमी होईल त्यामुळे, जंगलातील प्राण्यांचे व माणसांचे जीवन सुरक्षित आणि सुव्यवस्थित चालू राहील असे वाटते.




## श्री रामेश्वर धाम

ज्योतिर्मय साहित्य

**आपल्या भारतात असंख्य ठिकाणी विविध तीर्थक्षेत्रे वसली आहेत. आपण या तीर्थ यात्रेस भाविकतेने भेट देत असतो. त्या तीर्थ स्थानाचे महत्त्व काय? तेथे यापूर्वी संत महात्म्यांनी भेटी दिल्या त्या कथा. तेथील इतिहास हा आपणास बरेचदा माहित नसतो. अशा दिव्य स्थानाला भेट देण्यापूर्वी आपल्याला हा इतिहास कळावा, तेथे पूर्व काळी भेट दिलेल्या दिव्य ऋषीमुनी, संत महात्मे, यांची त्यावेळेस आठवण होऊन, त्यांची दिव्य कृपा किरणे आपणास मिळावीत या उद्देशाने अशा तीर्थ स्थानाची महती सांगणारी ही लेखमाला ''जाऊ देवाचिये गावा'' या नावाने सुरू करीत आहोत. या मालिकेतील पहिले पुष्प ''श्रीरंगम'' हे यापूर्वीच प्रकाशित केल्या गेले आहे. आता दुसरे पुष्प ''रामेश्वरम'' या तीर्थ क्षेत्राची माहिती आपण आज घेऊयात.**

रामेश्वर हे तामिळनाडू राज्याच्या रामनाथ पुरम जिल्ह्यातील एक लहान शहर आहे. रामेश्वरम शहर ,तामिळनाडूच्या आग्नेय भागात, मन्नार च्या अखाता मध्ये असलेल्या रामेश्वर व्दिपावर वसलेले आहे. या बेटालाच पंबन बेट म्हणतात. हे भारताच्या मुख्य भूमीला, पंबन पुलाने जोडलेले आहे. हे श्रीलंका आणि तामिळनाडू यांच्यातील मन्नारच्या आखातात येते.



रामेश्वरम येथील मंदिराचा काही भाग ११ व्या शतकात बांधल्या गेला असावा असे मत आहे. हे मंदिर राजा किशोर सेतु पती यांनी बांधल्याचे बोलले जाते. श्रीलंकेतील जाफना येथील पांड्य राजा जयवीर सिंग एरियान १३८० ते १४१० यांनी गर्भगृहाचा जिर्णोद्धार करविला.

इसवी सन १३११ मध्ये मलिक काफूर ने हे मंदिर लुटले व अगणित संपत्ती लुटून नेली.

या मंदिराचा कॉरिडॉर सर्वात लांब आहे. त्याची उंची ६.९ मिटर आहे.पूर्व पश्चिमेला ४०० फूट व उत्तर दक्षिणेला ६४० फूट आहे. याशिवाय आतील कॉरिडॉर २२४ फूट आणि ३५२ फूट आहे. कॉरिडोर ची एकूण लांबी ३८५० फूट आहे. बाह्य कॉरिडॉर मध्ये तीस फूट उंचीचे १२१२ खांब आहेत. मुख्य टॉवर ५३ मीटर उंच आहे.

या मुख्य मंदिरात,विजय नगरच्या सम्राटाने उभारलेले एक अन्य उप मंदिर आहे. तलवार व शिंग धारण केलेली पार्वत वर्धिनी म्हणजे पार्वतीचे स्वतंत्र मंदिर या मंदिरात वेगळे आहे. तसेच विष्णू व गणेश यांचीही मंदिरे आहेत. येथे महान योगी पतंजली यांची ही समाधी ही आहे. येथे अनघू मंडपम, शुक्रवार मंडपम, सेतु पती मंडपम, व नंदी मंडपम असे विविध हॉल आहेत. रामेश्वर बेटावर ६४ तीर्थे आहेत. त्यापैकी २२ तीर्थे ही मंदिराच्या परिसरात आहेत. स्कंद पुराणानुसार या तीर्थांचे स्नान करणे हे तीर्थ यात्रेचा एक प्रमुख भाग आहे. ही २२ तीर्थ म्हणजे प्रभु रामाच्या भात्यातील २२ बाण असल्याचे मानले जाते. रामेश्वरम हे चार धामा पैकी प्रमुख असे एक धाम आहे.

(क्रमशः)

सिडको परिसरात लवकरच शुभारंभ....
एक छान लोकेशन जिथे आपण --
बर्थडे पार्टी ▪ रिसेप्शन ▪ किटी पार्टी
▪ कॉन्फरन्स मिटिंग ▪ गेट - टू - गेदर
▪ सांस्कृतिक कार्यक्रम ▪ प्रकाशन समारंभ
▪ डोहाळ जेवण ▪ भिशी पार्टी व इतर...
हे व असे बरेचसे कार्यक्रम करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. एसी हॉल, लॉन, गार्डन, केटरिंग व्यवस्था, इव्हेंट मॅनेजमेंट, साउंड सिस्टीम सर्व व्यवस्था एकाच ठिकाणी
विशेष : - प्रसन्न वातावरण - सुलभ पार्किंग व्यवस्था - सौजन्य सेवा - मध्यवर्ती ठिकाण - अगदी किफायतशीर दरात
सिद्धिविनायक
▪ हॉटेल ▪ लॉन ▪ इव्हेंट
संपर्क : 7498560019, 7588803314
Email phulambrikarrajendra@gmail. com



ऑनलाईन औषधोपचार
आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906




# दहशतवादाच्या उच्चाटनाचे आव्हान दिल्ली स्फोटाचा अन्वयार्थ

ज्योतिर्मय साहित्य
(मागील अंकावरून)

अन्वयार्थ काय आहे :

लाल किल्ल्या जवळच्या भीषण स्फोटाचा अन्वयार्थ काय असेल तर पाकिस्तान पुन्हा एकदा शॅडोवार करण्याच्या खूमखुमीत आहे. आपल्या दहशतवादी गटांना हा देश स्वखर्चाने पोसतो आणि त्यांच्या मदतीने अशा प्रकारचे दहशतवादी हल्ले घडवून आणतो त्यासाठी मोठ्या प्रमाणात साधनसामुग्रीच्या आर्थिक व्यवहाराचा आणि डावपेचांचा भार सुद्धा तोच उचलतो, त्यामुळे त्याला पाक पुरस्कृत दहशतवाद असे स्पष्टपणे म्हटले जाते. आणि ते खरे आहे प्रत्यक्ष युद्धामध्ये पाकने तीन-चार वेळा मार खाल्ला आहे. त्यामुळे पुढील काळात असेच मागल्या दरवाजाने दहशतवादी हल्ले करावयाचे हे पाकचे जुने तंत्र आहे. कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडे असे म्हणतात ते खरेच आहे कारण कितीही अंजारले गोंजारले तरीही पाकिस्तानची ही वाकडी, तिरपी चाल कमी होत नाही. याचे दुःख वाटते. या घटनेचा अन्वयार्थ काय असेल तर पाकिस्तानला लोकशाही मार्गाने आपला विकास करावयाचा नाही. आणि सतत शेजारी राष्ट्रांमध्ये काहीतरी हस्तक्षेप करून तेथील विकासाला खिळ घालावयाची हे जुने तंत्र आहे. खुद्द पाक समोर सध्या समस्यांचा डोंगर उभा आहे तेथील बलुची मुक्ती लढा हा दररोज नवे धक्के देत आहे, शिवाय पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यातील सीमा युद्ध काही केल्या थांबत नाही पाक मधील विरोधी पक्ष तारीखे इंसाफ अनेक चळवळी करत आहे. या परिस्थितीत आपले अपयश झाकण्यासाठी पाकिस्तान सरकार भारतावर दहशतवादी हल्ले करून तेथील जनतेचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत आहे.

पाक मध्ये सत्तेवर असलेले शहाबाज शरीफ आणि झरदारी यांचे सरकार लोकशाही प्रक्रियेने काम करण्याऐवजी हस्तक्षेप, हिंसाचार आणि वाम मार्गाचा उपयोग करून दुष्ट कारवाया करत आहे जैश ए मोहम्मद सारख्या संघटनेचे षडयंत्र पाकच्या पुरस्काराशिवाय घडू शकत नाही, ही दगडावरची रेघ आहे. संयुक्त राष्ट्र संघ आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने तसेच जागतिक बँकेने पाकिस्तानला आर्थिक सहाय्य करताना ही रक्कम दहशतवादाच्या विरोधात वापरली जाणार नाही, याबाबत हमी घेतली पाहिजे. जेव्हा बेलआऊटची वेळ येते तेव्हा पाक नेते जागतिक संघटनांच्या हातापाया पडतात आणि क्षमा याचना करून आर्थिक संकट दूर करतात. पण नंतर मात्र त्यांची पुन्हा तिरपी चाल कायमच राहते त्यांचे खाण्याचे आणि दाखविण्याचे दात वेगळे आहेत याची खात्री पटत आहे.



विकासाऐवजी विध्वंस

पाक या शब्दाचा अर्थ पवित्र असा होतो परंतु विकासाची पवित्र कामे करण्याऐवजी जगातील अनेक देशात विध्वंस आणि मानवतेचा अपमान करणारी कृत्ये पाक पुरस्कृत दहशतवादी संघटनांनी जगभर केली आहेत. बराक ओबामा यांना ओसामा बिन लादेन यांची पाक मधील एबटाबाद येथून धरपकड करावी लागली होती आणि अमेरिकेने त्यांच्यावर वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि पेंटागॉन वर जे दहशतवादी हल्ले झाले होते त्याचा बदला घेतला होता. याउलट आता डोनाल्ड ट्रम्प मात्र पाक नेत्याशी गोडी गुलाबीचे धोरण का आखत आहेत? याचे कोडे काही उलगडत नाही पाकिस्तानचे नेते आपल्या देशाचा सामाजिक आणि आर्थिक विकास करण्याऐवजी तेथील गरिबी आणि दारिद्र्याचे उच्चाटन करण्याऐवजी शेजारी देशांमध्ये हस्तक्षेप करून तेथे हिंसाचार घडवीत आहेत. अशा प्रकारच्या शाडो युद्धामुळे भारत आणि लोकशाही राष्ट्रांचे नुकसान करण्याचा पाकचा प्रयत्न म्हणजे त्यांच्या काकनीतीचा एक डाव आहे हा डाव सर्व लोकशाही राष्ट्रांनी वेळीच उधळून लावला पाहिजे. दहशतवादाला पाठीशी घालण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा चुराडा पाकिस्तान करते. तोच पैसा त्यांनी आपल्या देशातील गरिबी आणि दारिद्र्य दूर करण्यासाठी खर्ची घातला तर तेथील सामान्य माणसाचे असह्य जीवन सुसह्य होऊ शकते, पण पाकिस्तानच्या नेत्यांमध्ये एवढा तारतम्य भाव कुठे आहे, त्यांना आपल्या जनतेच्या विकासाऐवजी देशात आणि शेजारी देशात विध्वंस घडवून आणण्यातच आनंद मिळतो. याला काय म्हणावयाचे हा एक दैव दुर्बिलास म्हटला पाहिजे अशा प्रकारच्या कारवायामुळे भारताचा विकास वेग तसूभर ही कमी होणार नाही, कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही हे पाक नेत्यांनी लक्षात ठेवावे आणि हे नापाक इरादे बंद करावेत, नाहीतर इतिहास त्यांना मुळीच क्षमा करणार नाही.

संपूर्ण उच्चाटन करावे

३५० किलो स्फोटके आणि एके ४७ बंदुका फरीदाबाद मध्ये जिथे सापडल्या तेथून सबळ पुरावे मिळविले जात आहेत, आणि संपूर्ण धागेदोरे हळूहळू उलगडत आहेत त्यामध्ये संपूर्ण नेटवर्क उघड करण्याचा आणि त्यामागे पंचमस्तंभि कारवाया करणाऱ्या राष्ट्रविरोधी शक्तींचा बीमोड करण्यावर भर दिला जात आहे आता खरे आव्हान आहे ते दहशतवादाचा संपूर्ण विमोड करण्याचे त्यासाठी एक कायमस्वरूपी यंत्रणा उभी करावी लागेल इजरायल मध्ये मोसाद सारखी अत्यंत सतर्क व जागरूक गुप्तचर यंत्रणा उभी करून सर्व प्रकारच्या दहशतवादी कारवायावर करडी नजर ठेवावी लागेल. डोळ्यात तेल घालून सदैव जपावे लागेल भारताच्या कोणत्याही शहरात कोणत्याही भूमीत दहशतवादी कृत्य करण्याची हिम्मत कोणत्याही दहशतवादी गटाने करू नये एवढी सतर्कता सदैव बाळगावी लागेल. एक कायमस्वरूपी दहशतवाद विरोधी राष्ट्रीय यंत्रणा विकसित करून तिच्या प्रगत व्यवस्था सर्व महानगरामध्ये सागर किनाऱ्यावर गस्त ठेवण्यासाठी विकसित करावी लागेल.

समारोप


डॉ. वि. ल. धारूरकर, पुणे
मो. ९२२५३१३५९२

दहशतवाद हा एक दुर्धर कर्करोग आहे पाकिस्तान ज्या पद्धतीने दहशतवादाच्या कर्करोगाचे विषाणू तयार करतो आणि त्यांचा प्रसार करतो त्याला वेळीच आवर घालण्यासाठी ठोस कृती कार्यक्रम आवश्यक आहे असा कृती कार्यक्रम प्राधान्याने प्रगत युद्धतंत्र आणि प्रगत मोहिमांवर आधारित असला पाहिजे आता भारताकडे ब्रह्मोस यासारखी क्षेपणास्त्रे आहेत, प्रगत लढाऊ विमाने आहेत सक्षम व जागरूक नौदल आहे आणि आपले लष्कर जगातील उत्तम दर्जाचे लष्कर आहे आपल्या या सर्व क्षमता विचारात घेता पाकचा पराभव करणे सहज शक्य आहे. परंतु आपली भूमिका अधिक समंजस विवेकी आणि शांततापूर्ण आहे. ऑपरेशन सिंदूर करताना तेथील सामान्य माणसाच्या जीवनाला आपण तसुभरही धक्का दिला नव्हता हे साऱ्या जगाने पाहिले पहलगाम हल्ल्यानंतर पाकिस्तान अवाजवी डरकाळ्या फोडत आहे. त्याला वेळीच आवर घालण्यासाठी आणखी एका मोहिमेची आवश्यकता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात त्याप्रमाणे ऑपरेशन सिंदूर संपलेले नाही त्याचा एक टप्पा पूर्ण झाला आहे, आता पुढील टप्प्यात नवी कारवाई करताना आपण दहशतवादाच्या संपूर्ण उच्चाटनावर भर दिला पाहिजे तसे झाले तरच पाकिस्तान शरण येऊ शकेल. नाहीतर येरे माझ्या मागल्या या न्यायाने आपल्याला वारंवार डोकेदुखी करणाऱ्या या शेजाऱ्याला कसे आवरावयाचे हा खरा प्रश्न आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे दूरदर्शी धाडसी आणि तेवढेच सावध असे अष्टपैलू नेते आहेत. नेतृत्वाखाली भारत दहशतवादाच्या विरोधात एक व्यापक व्यासपीठ तयार करत आहे. या व्यासपीठाला आता अधिक भक्कम करून पाकला चोख प्रतिउत्तर देण्याची वेळ आली आहे आणि याबाबतीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हातात सुदर्शन चक्र घेतले आहे. आणि ते आता या सुदर्शन चक्राचा उपयोग अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी समर्थपणे करतील यात शंका नाही. दहशतवादाचे समाजशास्त्र असे सांगते की त्यामुळे होणारे नुकसान सबंध जगाचा जीडीपी कमजोर करत आहे त्यामुळे होणारी जीवित व वित्तहानी रोखली तर तिसऱ्या जगातील दारिद्र्य अधिक गतीने कमी करणे साध्य होईल.

# स्त्री मनातील भावस्पर्शी अभिव्यक्तीची काव्यसरिता

ज्योतिर्मय 📖 साहित्य


सहित ते साहित्य ही लेखनाची प्रांजळ भूमिका असेल तर असे साहित्य वाचक-रसिकप्रिय ठरते. कथा, कविता,

ललितलेखन,कादंबरी यातून येणारे चित्रण हे अभिव्यक्तीचा उत्कट हुंकार असतो. साहित्यातही कविता हे माध्यम व्यक्त- अभिव्यक्त होण्याचे प्रभावी असे माध्यम असते.बदलत्या काळानुसार सामाजिक संदर्भ जसे बदलतात तसे त्याचे प्रतिबिंब मनामनात उमटत असते. आजचे युग हे अतिजलद वेगाचे,तंत्रज्ञानाचे नव्हेतर त्याहीपुढील

एआयचे आहे. काळ बदलला की विचार बदलतात तशा जाणिवाही बदलतात. मानवी जीवनाचे अनेक पैलू हे संवेदनशीलतेवर आधारित असतात. यातही पुरुषापेक्षा स्त्री मन अधिक हळवे आणि संवेदनशील असते. मनातील विचार शब्दाच्या माध्यमातून उतरवत त्याला काव्य सरितेचे रुप देत अभिव्यक्तीचा जागर दहा मैत्रिणींनी मांडत अनोखा कवितासंग्रह तयार केला आहे. उदगीर येथील गुरुमाऊली प्रकाशनचा कवयित्री संपदा काटे- कुलकर्णी संपादित काव्यसरिता या कवितासंग्रहाचे प्रकाशन बुधवारी पाच नोव्हेंबरला होत आहे.माजलगाव येथील प्रसिद्ध लेखिका प्रा. स्नेहल पाठक यांची सविस्तर आणि अभ्यासपूर्ण प्रस्तावना हीच कवितासंग्रहाची मोठी जमेची बाजू आहे...

जालन्यातील दहा साहित्यिक मैत्रिणींची एकत्रित असलेली शब्दातीत एक साहित्यकृती म्हणजे

काव्यसरिता कवितासंग्रह होय. काळ कुठलाही असो, स्त्री ही जात्याच संवेदनशील असते,तशी ती सहवेदना जपणारी असते. अशा निरीक्षणाना एकत्रित एकाच धाग्यात गुंफण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे काव्यसरिता होय, अशी भूमिका मनोगतात संपदा काटे- कुलकर्णी यांनी मांडली आहे. कवितासंग्रहाला प्रस्तावना लिहिताना प्रसिद्ध लेखिका प्रा.स्नेहल पाठक नमूद करतात,की कविता ही करायची नसते, ती आपसूकच होत असते.अशीच कविता रसिकांच्या मनाचा ठाव घेते.सभोवताली जे जे




पाहिलं, अनुभवलं,

परिस्थितीचे निरीक्षण करता येते तेव्हा तिथेच कवितेचा जन्म होतो, असेही प्रस्तावनेत प्रा.पाठक लिहितात. कवितासंग्रहातील कविता या आशयगर्भ, प्रतिमांची आरास, विषयाची विविधता तसेच वास्तवाला चिंतनाची जोड देणाऱ्या कविता लक्ष वेधून घेतात, असा अभिप्राय प्रा.स्नेहल पाठक यांनी दिला आहे. कवितासंग्रहातील कवितांमधून

विषयाचा एक समान धागा दिसून येतो, तो म्हणजे स्त्री जीवन, पदर, माहेर, मन, महिला दिन, तारुण्य, बालपण अशा विषयांच्या कविता कवितासंग्रहात अधिक आहेत. जालन्यातील स्वाती रत्नपारखी, रंजना मांटे, सीमा कंडारे, मयुरा देशमुख, सुहद नाईक,संपदा कुलकर्णी, वैशाली खेडकर, अपर्णा वाजपे, रेणुका सहस्रबुध्दे, आरती सदाव्रते या साहित्यिक मैत्रिणींच्या प्रत्येकी चार- पाच कवितासंग्रहात कविता आहेत.

कवितासंग्रहात कवयित्री सुहद नाईक यांनी जिजाऊ, सिंधुताई सपकाळ, सावित्रीमाई अशा आदर्श प्रेरणादायी व्यक्तीमत्व कवितेतून चितारले आहे. कवितासंग्रहात कवितेतून

मानवी स्वभाव वृत्ती प्रवृत्ती कशा असतात आणि अगदी जवळच्याच माणसांचे अनुभव कसे अस्वस्थ करतात याचे चित्रण कवयित्री आरती सदाव्रते एका कवितेतून करतात,ते असे...

उन्हाच्या तापापासून
बचाव करता येईलही
डोक्याला ताप देणाऱ्याचे
करणार काय?

असा सवाल कवितेतून उपस्थित केला जात आहे.अध्यात्म आणि भावभक्तीचा अनंत काळापासून चालत आलेला महिमा याचे संदर्भ कवितेतून देत

अद्वैत भाव कसा याचे सुंदर वर्णन कवितासंग्रहाच्या संपादिका संपदा काटे यांनी कवितेतून केले,

ते असे..

अद्वैताचा भाव राधेचा
कृष्णही गुंतुन गेला
ऐकून पावा मंजूळ स्वर
कालिंदी काठही भिजला..

कृष्ण राधेच्या अनुपम भावभक्तीचा संदर्भ कवितेत उत्तमपणे साकारला आहे. कवितासंग्रहात रंजना मांटे यांनी अभिजात या कवितेतून मराठी भाषेचा गौरव शब्दात चितारला आहे.

या मायेने उघडी केली
मनामनाची कवाडे
गुणदोषांचे मापन करती
एकनाथी भारुडे...

मराठी भाषेची महती आणि संत परंपरेतील संत एकनाथ महाराज यांच्या ज्ञानरुपी अनमोल वारसा कसा जतन करावा याचे चित्रण कवितेत आले आहे. कवितासंग्रहात दहा कवयित्रींच्या ४७ कविता आहेत. कवितांचे विषय जरी साधे सोपे असले तरी जीवनातील विविध घटनांचा संवेदनशील मनाने घेतलेला शोध आहे.

काव्यसरिता
पुस्तक परीक्षण : सुहास सदाव्रते
संपादिका : संपदा काटे- कुलकर्णी
गुरुमाऊली प्रकाशन उदगीर
पृष्ठे ७४ किंमत १५०

# चिझी साबेली.. फ्युजन:

ज्योतिर्मय 📖 साहित्य

सामोसा व कच्छी दाबेली फ्युजन:

हल्ली मुलानाच काय, मोठ्याना सुद्धा सतत बाहेरचे काहीतरी चटपटीत खायला हवे असते. म्हणूनच साऱ्यांचा ओढा जंकफूड, स्ट्रीट फूडकडे जास्त आहे. पण जिभेचे लाड पुरवताना आपण कधी याच्या अधीन होतो हे समजतही नाही. हे आरोग्यासाठी घातक आहे, बाहेरील स्ट्रीट फूडची क्वालिटी बहुतेक वेळा थोडे स्वस्त असल्यामुळे उत्तम, दर्जेदार नसते. हे समजूनही आपण ते खातो आणि आजारी पडतो, पित्त, पोटाचे विकार, किंवा इतर आजार उद्भवतात. हे टाळण्यासाठी आपण आज घरीच एक वेगळी, सुरेख डिश बनवूया.

सामोसा आणि कच्छी दाबेली हे दोन्ही प्रकार सर्वांचे खूप लाडके आहेत. म्हणूनच यांचे फ्युजन करून ही खास डिश बनवू .






साहित्य :

२ मोठे उकडलेले बटाटे ,अर्धा इंच आले ७-८ लसूण पाकळ्या, अर्धी वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर,२ हिरव्या मिरच्या, कढिपत्ता, १ मध्यम आकाराचा कांदा, १ चमचा दाबेली मसाला, बटर, २ चमचे तेल, मीठ, फोडणीचे साहित्य, पाव वाटी भाजलेले शेंगदाणे, पाव वाटी डाळिंबदाणे, चिंच गुळाची चटणी, १ वाटी मोझरेला चीझ, बारीक शेव, २ मोठ्या वाट्या मैदा, अर्धा चमचा बेकिंग सोडा.

कृती :

पारी बनवण्यासाठी :

२ चमचे मैदा बाजूला काढून बाकीचा मैदा एका बाउलमध्ये घेऊन त्यात २ चमचे तेल मीठ, बेकिंग सोडा घालून घट्ट भिजवून झाकून ठेवावा.

सारण बनवण्यासाठी:

कांदा बारीक चिरून घ्यावा.बटाटे बारीक कुस्करून घ्यावेत. कोथिंबीर बारीक चिरून घ्यावी. आले, लसूण, हिरव्या मिरच्या एकत्र मिक्सरमधून वाटून घ्याव्यात. मग एका कढईमध्ये तेल गरम करून फोडणीचे सर्व साहित्य घालून खमंग फोडणी करावी. त्यात कांदा गुलाबी होईपर्यंत परतावा .मग मिक्सर मध्ये वाटलेली पेस्ट घालावी. दाबेली मसाला व बटाटा घालून छान परतावे.नंतर त्यात मीठ व बारीक चिरलेली कोथिंबीर घालून मस्त परतून स्टफिंग तयार करून घ्यावे. हे थंड करण्यास ठेवावे.

मैदा आतापर्यंत छान भिजलेला असेल. या मैद्याचे मस्त मळून फुलके बनतील असे तेल लावून गोळे बनवावेत. हे सर्व फुलके लाटून तव्यावर एका बाजूने पूर्ण भाजून घ्यावेत.


बाजूला ठेवलेल्या मैद्यात थोडे पाणी घालून घट्टसर पेस्ट बनवून घ्यावी. फुलक्यांची पूर्ण भाजलेली बाजू वर करून त्यावर चिंचगुळाची चटणी पसरवून त्यावर स्टाफिंगचा गोळा ठेवावा. थोडे शेंगदाणे, डाळिंब दाणे घालावेत. १ चमचा मोझरेला चीज़ घालून एक बाजू दुमडून त्यावर मैद्याची पेस्ट लावून दुसरी बाजू त्यावर दुमडून चिकटवावी. राहिलेल्या दोन्ही बाजू पण अशाच व्यवस्थित घट्ट बंद करून घ्याव्यात म्हणजे गरम केले तरी आतील चीज़ वितळून बाहेर येणार नाही.अशा प्रकारे सर्व साबेली तयार करून ठेवाव्यात.


खायला देण्याच्या वेळेस एका तव्यावर बटर घालून सर्व बाजूनी खरपूस भाजून सर्व्हिंग डिश मध्ये काढून बारीक शेव घालून गरम गरम सर्व्ह करावी.


वैशिष्ट्य :

यामुळे घरीच इतका सुरेख फ्युजन प्रकार खायला असल्यावर सारे खुशच होतील. शिवाय सामोसा तळतात त्यात खूप तेल पोटात जाते. बाहेरचे खाल्ले तर पुन्हा पुन्हा तळलेल्या तेलात तळलेले सामोसे खावे लागतात. दाबेलीतील पावामध्ये खूप मैदा असतो. तो सुद्धा ताजा असेलच याची काय ग्यारेन्टी? मग रिस्क घेण्यापेक्षा हे फ्युजन कधीही दोन्ही पेक्षा आरोग्यासाठी उत्तम आहे.

मैद्याच्या खुसखुशीत कव्हर मुळे चवीला थोडा सामोसा व बाकी स्टफींगमुळे चीज़ी दाबेलीचा फील येतो. कुरकुरीत शेवेमुळे आणि चीज़ मुळे लज्जत आणखिनच वाढते. आवडत असेल तर वरून थोडा चाटमसाला भुरभुरावा. ही डिश खूपच टेस्टी आणि सर्वांना आवडेल अशी आहे. पोट भरण्यासारखी, खमंग मधल्यावेळेस खाण्यासाठी खूप छान पर्याय आहे. सर्वजण तुटून पडतील आणि वाहवा करतील अशी ही चटपटीत डिश आहे. नक्की बनवून पहाच.



माणसा माणसा जागा हो

माणसा माणसा जागा हो मानवतेच्या
माळेतील धागा दीनदुबळ्या अनाथांची
मायेची सावली हो निराश उदास
खचलेल्या निराधारांचा आधार हो


लाख संकटी झेलूनी स्वस्तित्व निर्माण
करणे अत्याचारित अबलांवरील
अन्याय दूर करणे सोडूनी संघासारखे
जगणे दुर्जनांचा कर्दन का सज्जनांचा
कैवारी शूरवीर शिवराय हो

वर्षानुवर्ष अन्यायात कितपत पडलेल्या
समाज उद्धारासाठी शिकवणी
आत्मसन्मानित नव समाज निर्माण
करणे दूर करण्या भय प्रत काळोख
सारा नवतेजाची पेटती मशाल
भारतरत्न बाबासाहेब हो

अज्ञान अंधश्रद्धा गुलामीचे जोखड
झुगारण्या उन्नतीसाठी बहुजन सकल
समाजाच्या विषमता जाती धर्मवाद
मानसिक गुलामगिरीच्या
निर्मूलनासाठी समाजभूषण रयतेचा
राजा राजश्री शाहू हो

ज्ञानदानाने समृद्ध करण्या माता
भगिनी लेकिन 12 बलुतदारांच्या
शेतकऱ्यांच्या विकासासाठी अपमान
कुटील डावपेचा नाही न डगमगणाऱ्या
समाज परिवर्तनाची पहाट जागविण्या
क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा हो

श्री प्रकाश शिवाजी भोंगाळे
मायणी ता खटाव जि सातारा
मो नं 9271689230



कोकिळेचा तास


वर्गाच्या कौलात
चिमण्यांना पाहून
कोकिळेस वाटले
शिरावे वर्गात.......।।

झाडावरून ती
वर्गात शिरली
मंजुळ स्वरातून
गाऊ लागली....।।

कवितेचा तास
कोकिळेने घेतला
मुलांच्या गळी
छान उतरला....।

जरी पडला टोल
नाही राहिले भान
मुलांच्या तालाने
विसरले देहभान.....।।

©®दत्ता तरलगट्टी,
पंढरपूर



🌹सिंगल मदर ..

उद्रेकात रे अतिरेक
पति पासून विभक्त
सिंगल मदर राहणे
निर्णय घेतात सक्त

महिलांनी कधी तरी
स्पष्ट व्हायचे व्यक्त
स्वातंत्र्य विवादग्रस्त
कसे म्हणायचे मुक्त

न जुळणा-या बंधना
गुलामी नको बंदिस्त
टिकायला हवी नाती
दोन्ही बाजूंवर भिस्त

स्वतांच घडवलीमुर्ती
स्वहस्ते करी उध्वस्त
वेदनांची उसळे लाट
मनःशांती गं अस्वस्थ

जुळवून घ्यायला हवे
सल्ला देत राही भक्त
चुकत असेलं तिचेचं
विचार सरणी अशक्त

विषारी विखारी दृष्टी
क्रोधित करते रे रक्त
संसार थाटण्याऐवजी
उगाचं ना होई विरक्त

करायला हवे निदान
मुलांचेभविष्य सशक्त
निर्णय किती संयुक्त
ठरवणारं अंतिम वक्त

अनर्थ ..

शब्दांचा रे विपर्यास
अर्थाचा करा अनर्थ
उलट दिशा द्यायला
प्रयत्न करावे समर्थ

छोटी वेलांटी उकार
बदलूशकतोशब्दार्थ
मीठपडता जास्तीचे
बिघडून टाके पदार्थ

पेटवा उद्रेकी वणवा
प्रत्येकगोष्टीत स्वार्थ
धरावे मौन नक्कीचं
भाषणात अ तत्वार्थ

विचार करा बोलता
कधी तरी रे निस्वार्थ
अ वास्तव निराधार
टिप्पणी करेअयतार्थ

वाहवत जातो वक्ता
न जाणता अन्वयार्थ
हेतु पुरस्सर नसताही
दुषित होई उत्तानार्थ

घात करे सत्कार्याचा
वाचाळ वाचा अत्यर्थ
कोलीत दे टिकाकारा
दूषणे लावाय प्रित्यर्थ

अंगलट येता लटलट
माफी मागा बिन शर्त
सारवासारवी करावी
प्रयत्नाची करती शर्थ


- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996.
www.kavyakusum.com



पक्ष्यांची शाळा (बालगीत)

हातात काय खुळूखुळा पायात वाजे छुमछुम वाळा
अंगणात भरली पक्षांची शाळा दुडूदुडू धावत ये रे बाळा..
चिऊ आली काऊ आला पाणी पिऊन भुर्र उडाला..
कबूतर चालले डौलात मोर नाचे पिसाऱ्यात..
कोंबडीचे पिल्लू उडाले कोंबडी लागली धावू
मिठू मिठू राघू बोलतो बाळाच्या हातात खाऊ.
कोकिळा गाते कुठून बाळ पाहते वाकून..
पक्ष्यांच्या शाळेत राहून गेले बाळ आनंदून..

@ प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर



मारले झुरळाला !

काल दुपारी ??
नाही गडे हो,
आज सकाळी,
स्वयंपाक घर
या घटनास्थळी,,
एका झुरळाची
झाली खांडोळी,,,

करत होते,
मी तर चटणी
शेंगदाण्याची
करून वाटणी,
हाती होती
मुसळ धाटणी,,

तोच वळवळत
मजकडेआला,,
घाबरून मी
ओरडा केला
पण तो भारी
धीटच मेला,
काही केल्या
ऐकेना गेला,,,

किती घाणेरडा
किळसवाणा
मिशा हलवुनी
बोलवितो मित्रांना
आज तुला
सोडणार नाही,,!!
प्रण केलेला
आठवला मी,,,

क्षणभराने
एकवटून शक्ती
प्रतिकाराची
केली युक्ती,,
पुढे, पुढे येवू
दिले मग त्याला
हळु उचलले
खलबत्याला,,,,


तो थोडा बेसावध
मग झाला,,
साधून संधी
आलेली नामी
खलबत्याखाली
दाबले त्या मी,,,

गेला की नाही ?
करावयास खात्री
कुतूहल दाटे
माझ्या नेत्री,,
हळूच उचलून
खलबत्याला
मी बघितले
हलवून त्याला,,
तो तर होता
निपचित पडलेला,,,

झाले होते त्याचे
काम तमाम,,
मलाही थोडा
फुटला होता घाम,,
वीरश्री ऐसी
संचारली अंगी
कौतुक आता
होणार जंगी
मिस्टरांना
सांगणार बढाई
घाबरत मी
झुरळाला नाही,,

आज विजय
माझा झालेला
मारले होते
मी झुरळाला,,,,,!!! 😀

©®©®
सौ. मनोरमा भारत बोराडे
छत्रपती संभाजी नगर



त्या कातर वेळी...

हुरहुरत्या कातर वेळी
अल्लड ती विसावलेली,
दूर शिवारी त्या काकोळली.
विरहात त्या कोमल सावळी..१..

व्याकुळ ती निहारते, त्याला अबोल
निसटता क्षण तो किती अनमोल,
नियतीच्या मनी संचिताचे मोल
रवि, निशा, रजनीश नि गोल..२..

बावरते सावरते नाजुकशी कळी
स्मृतीला अश्रूंची किनार कोवळी,
मंद वारा अन् धुंद मिटलेली पाकळी
चंद्र सवैरा शब्दांत उमलतात ओळी..३..

उगी सतावते, दूरची ती शीळ
खोल स्मरतो तो अवखळ तीळ
दूर सांच्यात ढळतो तो सदा यिळ
जीवनाच्या वाटेवर जणू उतावीळ..४..

© सौ. वैशाली चंद्रकांत महाडिक. (चंद्रसवैरा)
श्री क्षेत्र निनाम - सातारा
मो.क्र.- ९७६७४३७९२३



🌹 विडंबन काव्य

मी नाही यायचो नांदायला हो!
(चाल येऊ कशी तशी मी नांदायला)


नेहमीच बाई तुमची पिरपीर
नका लावू डोकं खाजवायला
तुमची आहे तिखट बोली
रोजच वाहता शिव्याची लाखोली
मी नाही यायचो नांदायला हो
मी नाही यायचो नांदायला हो

रोजच करता पान उतारा
हलकट मेला, डुक्कर म्हणता
शाल जोडीतून नेहमीच हाणता
मी नाही यायचो नांदायला हो
मी नाही यायचो नांदायला हो

अवघड कामाला गोड गोड बोलता
स्वार्थ आपला साधून घेता
नंतर लावता बोंबलायला
मी नाही यायचो नांदायला हो
मी नाही यायचो नांदायला हो

सासू गेली पारगावला
तक्रार माझी सांगू कोणाला
मेव्हणा आहे एकुता एक
वेळ नाही त्याला बोलायला
मी नाही यायचो नांदायला हो
मी नाही यायचो नांदायला हो

बी सुधीर
छ.संमभाजीनगर



लेक लाडकी

लेक लाडकी, लाडकी माझी - ज्ञानाची मुक्ताई,
मातृदान देण्या मला, माझ्या उदरी जन्मा येई.
किती जन्मांची पुण्याई कामी आली, कोणा ठावे,
दोन्हीं कुळे उद्धारील, असे अशिष लाभावे॥ १ ॥

लेक लाडकी, लाडकी - मी ही माया ममतेचा झरा,
कश्या पुरविल्या कोण जाणे, अमृताच्या धारा.
गोड हसू तिचे, किती टिपावे डोळ्यात,
बोल बोबडे ऐकून, हर्ष दाटला मनात॥ २ ॥

लेक लाडकी, लाडकी - जणू शुक्रांची चांदणी,
शुभ्र प्रकाशाने तिच्या आसमंत गेले फुलूनी.
लेक - जीव प्राण माझा, ठेव पित्याची आधार,
तिच्यासाठी मी नांदते, माझे सोडून माहेर॥ ३ ॥

लेक लाडकी, लाडकी - स्वरूपाची खाण,
रूपासवे तिच्या अंगी यावे, देवा सदगुण.
पितृमुखी लेक सदा व्हावी भाग्यवान,
यशकीर्ती वाढावी जगी, मिळावा सन्मान॥ ४ ॥

लेक लाडकी, लाडकी - जीवा भावाची मैत्रिण,
नित्य फुलव तिच्या जीवनी, देवा टिपूर चांदण.
उद्धरील किती कुळे, देवा तुला रे ठावूक,
तिच्या सुखासाठीच कर, मला तुझ्या भक्तीचे पाईक॥

सौ. रुपाली सुधीर गुरव

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559